गुरुवार, दि. ९ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ५० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




## शेतकऱ्यांप्रमाणे पुरग्रस्त व्यापाऱ्यांनाही पॅकेज द्यावे

### ॲड. महेश धन्नावत यांची राज्य सरकारकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाने दिवाळी निमित्त पुरग्रस्त शेतकऱ्यांसाठी इतिहासातील सर्वात मोठे, तब्बल रु ३१,६२८ कोटींचे मदत पॅकेज जाहीर केले आहे. या निर्णयाचे स्वागत करताना जालना येथील प्रख्यात समाजसेवक व वकील ॲड. महेश धन्नावत यांनी शेतकऱ्यांप्रमाणेच पुरग्रस्त व्यापाऱ्यांनाही आर्थिक मदतीचे पॅकेज देण्यात यावे, अशी ठाम मागणी राज्य शासनाकडे केली आहे.

ॲड. धन्नावत यांनी सांगितले की, अलीकडील पुरस्थितीत जालना शहरातील अनेक व्यापाऱ्यांच्या दुकानांमध्ये पाणी शिरून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले. फक्त मालसामानच नव्हे, तर त्यांच्याकडे काम करणाऱ्या कामगारांवरही या आपत्तीचे संकट ओढवले आहे. त्यामुळे आगामी दिवाळीत या व्यापाऱ्यांपुढे उपजीविकेचे मोठे संकट निर्माण झाले आहे.

ते पुढे म्हणाले की, जालना महानगरपालिकेने राज्य मानव अधिकार आयोगाकडे नाल्यांवरील अतिक्रमण दुरुस्त करून स्वच्छतेची हमी देणारे शपथपत्र सादर केले असूनही, प्रत्यक्षात आवश्यक ती कार्यवाही केली गेली नाही. या निष्काळजीपणामुळे अनेक व्यापाऱ्यांच्या दुकानात पाणी शिरले आणि त्यांना कोट्यवधींचे नुकसान सहन करावे लागले.

ॲड. धन्नावत यांनी नमूद केले की, शासनाने जसे शेतकऱ्यांच्या नुकसानीचा विचार करून पॅकेज दिले, तसेच व्यापाऱ्यांचेही नुकसान लक्षात घेऊन आर्थिक मदतीचा निर्णय तातडीने घ्यावा. व्यापारी वर्ग हा शहराच्या आर्थिक हालचालींचा कणा असून, त्यांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र पॅकेजची गरज आहे, अशी विनंती त्यांनी केली.

त्यांनी शासनाकडे व्यापाऱ्यांचे नुकसानग्रस्त दुकानांचे सर्वेक्षण करून तत्काळ मदत जाहीर करण्याचे आवाहन केले आहे.

२०२४-२५ वर्षाची खरीप पिकांची हंगामी पैसेवारी जाहीर

## जिल्ह्यातील ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** सन २०२४-२५ या वर्षाच्या खरीप हंगामात खरीप गावांची तसेच ज्या रब्बी गावांत दोन तृतीयांश पेक्षा जास्त खरीपात पेरणी केलेली आढळली आहे, त्या गावांची पैसेवारी देखील खरीप हंगामात जाहीर करण्यात करण्यात आली आहे. त्यानुसार जालना जिल्ह्याच्या आठ तालुक्यातील खरीप पिकांच्या पैसेवारीमध्ये खरीप गावे एकूण ६६७ व रब्बी गावे २९८ अशा एकूण ९६५ गावांची खरीप हंगामी पैसेवारी जाहीर केली आहे. यामध्ये जिल्ह्यातील ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.



जिल्ह्यातील ९७१ गावांपैकी ६६७ खरीप गावे व २९८ रब्बी गावे असे एकुण ९६५गावांची हंगामी पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. तर परतूर तालुक्यातील राणी वाहेगाव हे गाव पूर्णतः निम्न दुधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये पान २ वर

युवा आदर्श

### भरीव मदत ...

आपत्तीग्रस्तां त्वरित
मदत होईलं भरीव
साचेबद्ध उत्तरे सारे
सदैव देती आखीव
लोभसवाणे वक्तव्य
भासते सुरेख रेखीव
विश्वास बसे सर्वस्वी
शब्द वापरले घोटीव
आली आणली मदत
बातमी भरारे ऐकीव
सहाय्या कुणी न पुढे
सर्वां जरी वाटे कीव
कधी बांधता इमारत
कैकदा भरलीय नीव
अवघे आभाळ फुटले
टांगणीला लागे जीव
घडत नाही काही का
भावना असून सजीव
उन्मळून पडली पिके
पडे निपचित निर्जीव
वर वरची मलम पट्टी
समस्या राहे आजीव
उग्ररूप धारे अडचणी
प्रयास करून अतीव

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीसाठीची प्रारुप मतदार यादी प्रसिध्द

**जालना । प्रतिनिधी -** राज्य निवडणूक आयोगाच्या सुचनेनूसार दि.८ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा परिषद व त्याअंतर्गतच्या पंचायत समिती निवडणूकासाठी निवडणूक विभाग व निर्वाचक गण निहाय प्राकरुप मतदार यादी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, तहसील, पंचायत समिती, ग्रामपंचायत कार्यालयातील सुचना फलकावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे, तरी हरकती व सूचना संबंधित तहसील कार्यालयात विहीत मुदतीत सादर कराव्यात, असे आवाहन उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी केले आहे.

राज्य निवडणूक आयोग यांच्याकडून जिल्हा परिषद व त्याअंतर्गतच्या पंचायत समिती निवडणूकांसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून कार्यक्रमानूसार निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी दि.८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दि.८ ते १४ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत दाखल करण्याची मुभा देण्यात आली आहे. निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करुन दि.२७ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येतील. तसेच मतदान केंद्राची व मतदान केंद्रनिहाय यादी दि.२७ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

दावा न केलेल्या ठेवी परत मिळविण्यासाठी खातेदारांना आवाहन

## खातेदारांना परतावा मिळवून देण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील विविध बँकांमधील वैयक्तिक, संस्थात्मक आणि सरकारी योजनांच्या खात्यांमध्ये सुमारे ३० कोटी रुपयांच्या दावा न केलेल्या ठेवी शिल्लक आहेत. या ठेवींचा एकूण १,६०,४९९ खातेदारांना परतावा मिळवून देण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. ही मोहीम १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीत जिल्हा अग्रणी बँक - बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या पुढाकाराने आणि सर्व सदस्य बँकांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांनी दिली.

श्री. केदार यांनी सांगितले की, देशभरात सुमारे १ लाख ३५ हजार कोटी रुपयांच्या दावा न केलेल्या ठेवी विविध बँकांमध्ये शिल्लक आहेत. त्यापैकी महाराष्ट्र राज्यात ५,८६६ कोटी रुपये, ज्यात वैयक्तिक खात्यांच्या ४,६१२ कोटी, संस्थांच्या १,०८२ कोटी, आणि सरकारी योजनांतील १७२ कोटी रुपयांच्या ठेवी समाविष्ट आहेत.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमानुसार, १० वर्षांपासून निष्क्रिय असलेल्या खात्यांतील ठेवी पान २ वर




## विश्वासाची परंपरा जपण्यासाठी येत आहे चंदनझिरा येथे 'वरद ज्वेलर्स'

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील मंठा शहरात आपल्या विश्वासार्हतेमुळे ओळख निर्माण केलेले 'वरद ज्वेलर्स' आता जालना शहरात दाखल होत आहे. येत्या दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर चंदनझिरा येथील मातोश्री चौक, बजरंग रोड येथे वरद ज्वेलर्सची भव्य शाखा सुरु होणार असून, शहरातील ग्राहकांसाठी हे एक मोठे आकर्षण ठरणार आहे.

'विश्वास हीच परंपरा' या ब्रीदवाक्याने ग्राहकांचा विश्वास संपादन करणाऱ्या वरद ज्वेलर्सचे मालक सुधाकरराव खरात यांनी युवा आदर्श शी बोलताना सांगितले की, मंठा परिसरात आम्ही श्री गणेश ज्वेलर्सच्या माध्यमातून वर्षानुवर्षे ग्राहकांचा विश्वास जिंकला आहे. आता जालना शहरातील चंदनझिरा परिसरात नागरिकांना शुद्ध सोने-चांदी योग्य दरात आणि उत्कृष्ट डिझायनिंगसह मिळावे, हा आमचा उद्देश आहे. परंपरा आणि आधुनिकतेचा संगम असलेले आमचे दागिने प्रत्येक प्रसंगासाठी योग्य ठरतील.



नव्या शाखेत २२ आणि २४ कॅरेट सोन्याचे दागिने, चांदीच्या आकर्षक वस्तू, तसेच नववधूंसाठी खास ब्रायडल कलेक्शन उपलब्ध असणार आहे. त्यासोबतच डिझायनर नेकलेस सेट, मंगळसूत्रांचे नवनवीन डिझाईन, लहान मुलांसाठी खास कलेक्शन, तसेच चांदीच्या भेटवस्तूंची मालिका ग्राहकांना पाहायला मिळणार आहे.

ग्राहकांच्या सोयीसाठी दुकानात विश्वासार्ह बिलिंग प्रणाली, सोने चाचणी यंत्र, आणि विशेष दिवाळी ऑफर्स उपलब्ध असतील.


सुधाकरराव खरात म्हणाले, चंदनझिरा परिसर हा जालन्यातील मोठा आणि व्यापारी दृष्ट्या महत्वाचा भाग आहे. त्यामुळे आम्हाला खात्री आहे की, येथेही 'विश्वासाची परंपरा' जपण्याचा आमचा प्रयत्न नागरिकांना नक्कीच आवडेल.

दिवाळीच्या शुभारंभी सुरु होणाऱ्या या शाखेच्या उद्घाटनासाठी परिसरात उत्सुकता आहे. चकचकीत सोन्याच्या दागिन्यांची चमक, आकर्षक डिझाईन्स आणि विश्वासाची हमी यामुळे 'वरद ज्वेलर्स - चंदनझिरा शाखा' हे नाव जालना शहरातील दागिन्यांच्या विश्वात एक नवा अध्याय लिहिणार आहे.

## जलतरण प्रशिक्षक कैलाश झोळगे यांची हाफ आयर्नमॅन स्पर्धेत अभूतपूर्व कामगिरी

**जालना । प्रतिनिधी -** जगातील सर्वात कठीण स्पर्धा मानल्या जाणाऱ्या हाफ आयर्नमॅन २०२५ या प्रतिष्ठित स्पर्धेत जालन्याचे सुपुत्र व प्रख्यात जलतरण प्रशिक्षक कैलाश झोळगे यांनी अभूतपूर्व कामगिरी करत लोहपुरुष हा बहुमान पटकावला आहे. या यशामुळे ते जालन्याचे पहिले आयर्नमॅन ठरले असून, शहराचा क्रीडाअभिमान अधिकच उंचावला आहे.

कोल्हापूर येथे ५ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या या कठीण स्पर्धेत श्री. झोळगे यांनी सलग १.९ किमी जलतरण, ९० किमी सायकलिंग, आणि २१.१ किमी धावणे असे एकूण ११३ किमी अंतर केवळ ७ तास ५ मिनिटे ४४ सेकंदात पूर्ण केले. ही कामगिरी त्यांची सहनशक्ती, शिस्त, चिकाटी आणि मानसिक स्थैर्य यांची साक्ष देणारी ठरली आहे. लोहपुरुष हा किताब फक्त एक विजेतेपद नसून, तो खेळाडूच्या अंतः प्रेरणा, सातत्यपूर्ण सराव आणि स्वतःवरच्या अढळ विश्वासाचे पान २ वर



# ‘आखाता’तील संघर्षाची दोन वर्ष

दोन वर्षापूर्वी म्हणजे ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्राईलवर हल्ला करून इस्राईलच्या १२०० हून अधिक नागरिकांची हत्या करून २५१ नागरिकांचे अपहरण केले होते. हमासच्या या हल्ल्याला प्रतिउत्तर म्हणून इस्राईलने गाझा पट्टीवर हल्ला करून गाझा पट्टी अक्षरशः जमीनदोस्त केली. इस्राईल ने केलेल्या गाझापट्टीतील २३ लाख लोकसंख्येपेपैकी जवळपास सर्व लोक विस्थापित झाले आहेत. गाझात अन्न पाणी आणि सुविधांचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. गाझा पट्टीत मदत साहित्य पोहचवण्यास ही इस्राईल बाधा आणत आहे. गाझापट्टीत प्रचंड उपासमार निमर्ण झाली आहे. उपासमारीनेहजारो मुले कुपोषणग्रस्त झाली आहेत. गेल्या दोन वर्षात इस्राईलने केलेल्या हल्ल्यात पॅलेस्टाइनचे ६४ हजारांहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून त्यात १८ हजारांहून अधिक मुले आहे. या युद्धात इस्रायलने हमासचे २० हजारांहून अधिक दहशतवादी ठार केले आहेत. इस्राईलच्या हल्ल्यात गाझापट्टीत जखमी झालेल्या लोकांची संख्या दर महिन्याला सरासरी ६८०० इतकी वाढत आहे. या युद्धात इस्राईलचे हजारो नागरिक जखमी झाले आहेत. इस्राईलच्याही अनेक शहरांना हमासने टार्गेट केल्याने इस्राईलचीही दुरवस्था झाली आहे. इस्राईल - हमास युद्धाला आज दोन वर्ष पूर्ण झाली तरीही त्यांच्यातील संघर्ष संपलेला नाही. मागील वर्षी ८ ऑक्टोबर रोजी म्हणजे इस्राईल - हमास युद्धाला १ वर्ष पूर्ण होत असतानाच इस्राईलने लेबनॉनवर हल्ला केला होता. इस्राईलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यात लेबनॉन मधील हिजाबुल्ला या दहशतवादी संघटनेचा प्रमुख असलेल्या हसन नसरुल्ला हा ठार झाला होता. त्या अगोदर इस्राईलने लेबनॉनवर पेजर आणि वोकिटॉकी हल्ला केला होता. इस्राईलने लेबनॉनवर हल्ला करण्यामागचे कारण म्हणजे लेबनॉन हमासला करीत असलेले आर्थिक आणि लष्करी सहाय्य. लेबनॉन मधील हिजबुल्ले इस्राईल - हमास युद्धात हमासला आर्थिक आणि लष्करी सहाय्य पुरवत होते इतकेच नाही तर काही हिजबुल्ले प्रत्यक्ष युद्धातही सहभागी झाले होते त्यामुळे त्यांना धडा शिकवण्यासाठी इस्राईलने लेबनॉनवर हल्ला करून हीजबुल्लाना लक्ष केले होते. इस्राईल - हमास नंतर इस्राईल - लेबनॉन संघर्षाने जग चिंतेत पडले असतानाच या संघर्षात इराणने उडी घेऊन संघर्षाची व्याप्ती आणखी वाढवली. फक्त संघर्षाची व्याप्ती वाढवली नाही तर जगाची चिंताही वाढवली होती कारण इराण हा अरब देशातील किंबहुना इस्लामिक देशातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा देश आहे. इस्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतल्याने हा संघर्ष आणखी वाढणार हे स्पष्ट झाले. इस्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतली. इराणने इस्राईल हमास युद्धात उडी घेतल्याने इस्राईल आणि इराण यांच्यात युद्धाचा भडका उडाला. या युद्धात ही दोन्ही बाजूंनी मोठी वित्त आणि मनुष्य हानी झाली. या दोन देशाला तर युद्धाचा मोठा इतिहास आहे. १९८० सालच्या दशकात तर या दोन देशात कायम युद्धाच्या ठिणग्या पडत होत्या त्यामुळे या युद्धात इराण केंव्हाही उडी घेईल असे म्हंटले जात होते ते खरे ठरवत इराणने इस्राईलवर हल्ला करीत २०० हून अधिक क्षेपणास्त्रे डागली होती. अर्थात इस्राईलने या हल्ल्याचा यशस्वी बचाव केला. यात इस्राईलची म्हणावी तशी हानी झाली नसली तरी या हल्ल्याचा बदला घेतला जाईल असा इशारा इस्राईलने दिला आहे. हा इशारा खरा ठरवत इस्राईलने इराणवर क्षेपणास्त्रांचा मोठा हल्ला केला. हे युद्ध शिगेला पोहचले असताना अमेरिकेने मध्यस्ती केल्याने या युद्धाला काही काळ पूर्ण विराम मिळाला. या दोन्ही देशातील युद्ध काही काळ थांबले पण ते कायमस्वरूपी थांबले असे नाही. या दोन्ही देशात पुन्हा युद्धाला तोंड फुटू शकते. केवळ याच दोन देशातच नाही तर इस्राईल आणि त्यांच्या शेजारी असलेल्या अन्य मुस्लिम देशात युद्ध पेटू शकते. इस्राईल आणि अरब राष्ट्रातील या संघर्षाने जग दोन गटात विभागले गेले आहे. अमेरिका आणि युरोपातील काही देशांनी इस्राईलला पाठींबा दिला आहे तर जगातील मुस्लिम राष्ट्रे आणि युरोपातील काही राष्ट्रे अरब राष्ट्रांच्या पाठीशी उभी आहेत. अमेरिकेने इस्राईलला उघडपणे पाठिंबा दिल्याने इराणसह अन्य अरब राष्ट्रे इस्राईल प्रमाणे अमेरिकेलाही आपला शत्रू मानू लागली आहेत. अमेरिकेने आजवर प्रत्यक्ष युद्धात उतरून इस्राईलला साथ दिलेली नाही मात्र डोनाल्ड ट्रम्प हे विक्षिप्त आहेत. त्यांच्या मनात आले तर ते इस्राईलच्या बाजूने प्रत्यक्ष मैदानात उतरू शकतात आणि जर तसे झाले तर आजवर या युद्धात तटस्थ राहिलेले इजिप्त, जॉर्डन, सीरिया, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती हे अरब राष्ट्रे इराणला साथ देण्यासाठी मैदानात उतरील आणि जर तसे झाले तर ती तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात ठरेल म्हणूनच हा संघर्ष आणखी वाढू न देण्याची खबरदारी जगाने घ्यायला हवी.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मुंबईची नव प्रभात; भारत-ब्रिटन संबंधांसाठी ‘ब्रिस्क’ युगाची सुरुवात

मुंबई शहरात उत्साहाचे वातावरण आहे, कारण युनायटेड किंगडमचे (UK) प्रधानमंत्री केअर स्टारमर यांच्या दुसऱ्या दिवसाच्या दौऱ्यामुळे सर्वांचे लक्ष या शहराकडे लागून राहिले आहे. ‘ग्लोबल फिनटेक फेस्ट’च्या भव्य समारोपाकडे सगळ्यांच्या नजरा खिळल्या आहेत. भारत आणि यूके यांच्यातील वाढत्या मैत्रीचे हे जोरदार प्रदर्शन आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि प्रधानमंत्री स्टारमर आज एकत्र मुख्य भाषण देणार आहेत. ही भेट केवळ एक औपचारिक राजनयिक शिष्टाचार नाही, तर शतकानुशतके चाललेल्या सहकार्याच्या विकासाचा आणि दोन्ही देशांमधील जुन्या नात्यातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा कळस आहे.

**ऐतिहासिक वळणः ‘कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप’**
(Comprehensive Strategic Partnership)

२०२५ हे वर्ष भारत आणि यूकेच्या संबंधांसाठी एक निर्णायक वळण ठरले आहे. अनेक शतकांचा इतिहास असलेल्या या संबंधाला आता औपचारिक ‘कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप’चे रूप मिळाले आहे. ‘भारत-यूके व्हिजन २०३५’ या भागीदारीला मार्गदर्शन करत आहे, ज्यात दोन्ही देशांसाठी समान विकास आणि समृद्धीची योजना आहे. दोन्ही राष्ट्रांमध्ये भक्कम राजकीय इच्छाशक्ती असल्याने हे संबंध अधिक दृढ झाले आहेत. यावर्षी जुलैमध्ये प्रधानमंत्री मोदी यांनी यूकेचा दौरा केला, त्यानंतर प्रधानमंत्री स्टारमर यांचा भारत दौरा या भागीदारीला नवी गती देत आहे. हा दौरा दोन्ही देशांतील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण आणि मूर्त फायदे देण्याचे वचन देतो. उद्याचे (आजचे) भाषण, ज्यात १,००,००० हून अधिक जागतिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत, एका महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय मंचावर या भागीदारीची अविश्वसनीय क्षमता दर्शवणारा एक निर्णायक क्षण ठरेल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींसाठी, ज्यांच्या राजनयिक प्रवासात जगभरातील धोरणात्मक भागीदारांशी संबंध अधिक घट्ट करण्याचा समावेश आहे, हा क्षण भारताच्या जागतिक महासत्ता म्हणून उदयास येण्याचे प्रतीक आहे. देशांतर्गत आर्थिक सुधारणांना पाठिंबा देण्यापासून ते जागतिक लोकशाही भागीदारांशी जोडणी साधण्यापर्यंत, प्रधानमंत्री मोदी यांच्या प्रयत्नांमुळे यूकेसोबतच्या या नूतनीकृत अध्यायाचा पाया रचला गेला आहे. यूके, ज्याचा भारताशी ऐतिहासिक आणि बहुआयामी संबंध आहे, आता समान भागीदार म्हणून पुढे आले आहे.

**आर्थिक वाढ आणि संधींसाठी इंजिन**

मुंबईतील या बहुप्रतिक्षित घोषणांचा आधार याच वर्षाच्या सुरुवातीला, २४ जुलै २०२५ रोजी, स्वाक्षरी झालेला ‘व्यापक आर्थिक आणि व्यापार करार’ (CET - Comprehensive Economic and Trade greement) आहे. अनेक वर्षांच्या तीव्र वाटाघाटीनंतर हा महत्त्वपूर्ण करार व्यापार क्षेत्राचे स्वरूप बदलणार आहे. भारतीय ग्राहक, उत्पादक आणि निर्यातदारांसाठी हा करार नवीन संधींचे दरवाजे उघडेल, ज्यामुळे अनेक उद्योग आणि लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येतील. या करारामुळे यूकेच्या बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या ९९ टक्के भारतीय वस्तूंवरील सीमाशुल्क (Tariffs) संपुष्टात येईल. यात पारंपरिक भारतीय वस्त्रोद्योग, चामड्याच्या वस्तू, कृषी उत्पादने आणि ऑटोमोटिव्ह घटकांचा समावेश आहे. केवळ आकडेवारीच्या पलीकडे, या कराराचा उद्देश रोजगार निर्मिती करणे, नावीन्यपूर्णतेला (Innovation) प्रोत्साहन देणे आणि सर्व क्षेत्रांमध्ये समृद्धी वाढवणे आहे.

हा करार महत्त्वपूर्ण आकडेवारी दर्शवतो. द्विपक्षीय व्यापार सध्याच्या ४३ अब्ज पौंडांवरून वर्षाला २५.५ अब्ज पौंडांनी वाढण्याचा अंदाज आहे. याहूनही महत्त्वाचे म्हणजे, या करारामुळे कालांतराने भारताच्या वार्षिक सकल राष्ट्रीय उत्पन्नात (GDP) ५.१ अब्ज पौंडांची भर पडू शकते. या आकडेवारीमागे कारागिरांपासून ते तंत्रज्ञान स्टार्टअप्सपर्यंत, जागतिक बाजारपेठांमध्ये पोहोचण्याची कोट्यवधी भारतीयांची स्वप्ने दडलेली आहेत.

हा करार ४८ तासांच्या आत मालाच्या मंजुरीसाठी सीमाशुल्क प्रक्रिया सुलभ करण्याचे वचन देतो, ज्यामुळे लहान आणि मध्यम उद्योगांना (SME's) सामोरे जाव्या लागणाऱ्या लाल फितीच्या (Red Tape) अडचणी कमी होतील. हे प्रधानमंत्री मोदी यांच्या ‘व्यवसाय सुलभतेचे’ (Ease of Doing Business) भारताला जगातील शीर्ष जागतिक व्यापार आणि गुंतवणूक केंद्र बनवण्याच्या दीर्घकाळच्या प्रयत्नांना प्रतिबिंबित करते.

प्रधानमंत्री मोदी यांच्या धोरणात्मक भाषणांमध्ये अनेकदा उद्धृत केले जाणारे ‘व्यवसाय सुलभतेचे’ हे सूत्र या करारामुळे नव्याने महत्त्वाचे ठरते, कारण हा करार केवळ मोठ्या उद्योगांनाच नव्हे, तर विशेषतः भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या लहान आणि मध्यम उद्योगांनाही आधार देतो.

या कराराला यूकेमध्ये द्विपक्षीय पाठिंबा असल्याने राजकीय स्थैर्य सुनिश्चित होते, ज्यामुळे निवडणुकीच्या पलीकडेही या भागीदारीचे दीर्घायुष्य स्पष्ट होते. यूके ब्रेक्झिटनंतरच्या जागतिक दृष्टिकोनात भारताला किती महत्त्व देते, हे यातून दिसून येते.

**हिंद-प्रशांतमध्ये** (Indo-Pacific) **सुरक्षा बंधन मजबूत करणे**

ही भागीदारी केवळ अर्थव्यवस्थेपुरती मर्यादित नसून, संरक्षण आणि सुरक्षेच्या क्षेत्रातही पोहोचली आहे - जे ‘व्हिजन २०३५’च्या रोडमॅपचा आधारस्तंभ आहे. हिंद-प्रशांत (Indo-Pacific) धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र बनत असताना, दोन्ही देशांनी मुक्त, खुले आणि स्थिर प्रदेशासाठी एक समान दृष्टिकोन जपला आहे.

अलीकडील नौदल सराव ‘कोंकण २०२५’मध्ये हे चित्र स्पष्टपणे दिसले, जिथे भारताची आयएनएस विक्रांत आणि यूकेची एचएमएस प्रिन्स ऑफ वेल्स समन्वय साधून कार्यरत होती. ही कार्यात्मक समन्वयता दोन्ही सशस्त्र दलांमध्ये वाढती आंतरकार्यक्षमता (Interoperability) आणि प्रादेशिक शांततेसाठी त्यांची दृढ वचनबद्धता दर्शवते.

भारतीय वायुसेनेसोबतच्या हवाई संरक्षण सरावाने (Aerial Defence Exercise) या सहकार्याला पूरक बनवले आहे. ही त्रि-सेवा समन्वयता (Tri-service coordination) या भागीदारीच्या खोलीचे दुर्मिळ उदाहरण आहे.

याव्यतिरिक्त, जुलै २०२५ चा ‘संरक्षण औद्योगिक रोडमॅप’ (Defence Industrial Roadmap) खरेदीदार-विक्रेता गतिशीलता बदलून सह-विकास (Co-development) आणि संयुक्त उत्पादनाकडे एक मूलभूत बदल दर्शवतो. प्रधानमंत्री मोदी यांच्या ‘आत्मनिर्भर भारत’ या संकल्पनेशी जुळलेला हा रोडमॅप तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त संशोधन आणि भारताची देशांतर्गत संरक्षण उत्पादन क्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो. यातून भारताला जागतिक संरक्षण नवोपक्रम (Innovation) आणि धोरणात्मक स्वायत्ततेत अग्रेसर भूमिका घेता येईल, तसेच मोठ्या प्रमाणात उच्च-कुशल रोजगार निर्माण होतील.

**‘लिव्हिंग ब्रिज’ः चिरस्थायी लोक-ते-लोक जोडणी**

धोरणात्मक करारांपलीकडे, ‘लोक-ते-लोक जोडणीचा चिरस्थायी ‘लिव्हिंग ब्रिज’ या भागीदारीचे हृदय आहे. यूकेमधील भारतीय डायस्पोरा (Diaspora - स्थलांतरित भारतीय समुदाय), जो तेथील लोकसंख्येच्या २.६ टक्के आहे आणि ६५,००० हून अधिक व्यवसायांचे मालक आहेत, हे अमूल्य सामाजिक-आर्थिक बंधन दृढ करतात.

२०२५ मध्ये पुन्हा पुष्टी झालेली उच्च शिक्षण पात्रतेची परस्पर मान्यता भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांसमोरील अडथळे दूर करते, प्रतिभा गतिशीलता (Talent Mobility) आणि शैक्षणिक देवाणघेवाण वाढवते. जागतिकीकरणाच्या जगात जिथे कौशल्ये आणि ज्ञान सीमा ओलांडतात, तिथे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

‘व्हिजन २०३५’च्या शैक्षणिक विस्ताराचे उदाहरण युनिव्हर्सिटी ऑफ साउथम्प्टनच्या गुरुग्राम कॅम्पसच्या जून २०२५ मधील उद्घाटनातून दिसते. हा उपक्रम जागतिक प्रतिभेचे संगोपन करतो आणि दूरदृष्टीच्या शैक्षणिक सहकार्याचे प्रतीक आहे.

याला पूरक म्हणून, भारत-यूके ‘ग्रीन स्किल्स’ भागीदारी नवीकरणीय ऊर्जा, शाश्वत शेती आणि पर्यावरणीय लवचिकतेमध्ये (Environmental Resilience) तरुणांची क्षमता विकसित करते - ज्यामुळे भविष्यातील जागतिक आव्हानांसाठी तयारी सुनिश्चित होते.

**तंत्रज्ञान, नावीन्य आणि मुंबईच्या फिनटेक फेस्टमधील सामायिक भविष्य**

या भागीदारीचे भविष्यवेधी लक्ष तंत्रज्ञान आणि नावीन्य आहे, जे ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये स्पष्टपणे दिसत आहे. १०० हून अधिक देशांतील ८०० हून अधिक स्पीकर्ससह, हा उत्सव प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर यांच्या दृष्टिकोनासाठी एक आदर्श मंच प्रदान करतो.

डिजिटल पेमेंट आणि आर्थिक समावेशनात (Financial Inclusion) भारताची अग्रणी भूमिका यूकेच्या जागतिक वित्तीय परिसंस्थेचे (Global Financial Ecosystem) पूरक आहे, ज्यामुळे अधिक गहन तांत्रिक सहकार्याचा मार्ग मोकळा होतो.

‘तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमा’ (Technology Security Initiative) द्वारे, दोन्ही देश दूरसंचार, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मध्ये संयुक्त उपक्रम आणि सेमीकंडक्टर आणि खनिजांसाठी महत्त्वपूर्ण पुरवठा साखळी सुरक्षित करण्यावर भर देतात. लवचिक, अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली तयार करणे आता राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक वाढ जपण्यासाठी केंद्रस्थानी आहे.

हवामान कृती (Climate Action) हा एक मुख्य आधारस्तंभ राहिला आहे. दोन्ही देश स्वच्छ ऊर्जा स्वीकार आणि ग्रीन फायनान्स बाजारपेठांना कुशल बनवण्यास गती देतात. बीपी (BP) आणि शेल (Shell) यांसारख्या यूकेच्या कंपन्यांची भारतातील स्वच्छ इंधन आणि इलेक्ट्रिक वाहन पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक या उद्दिष्टांच्या दिशेने उचललेली व्यावहारिक पाऊले दर्शवते.

हवामान आणि नावीन्य यावरील आपल्या अनेक भाषणांमध्ये, प्रधानमंत्री मोदी यांनी असा दृष्टिकोन मांडला आहे जिथे आर्थिक वाढ आणि शाश्वतता (Sustainability) हातात हात घालून चालतात. ही द्विपक्षीय भागीदारी त्या दृष्टिकोनाला प्रतिबिंबित करते, ज्यामुळे ती जागतिक सहकार्यासाठी एक दीपस्तंभ ठरते.

**नव्या युगाची सुरुवात**

प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर आज आपले मुख्य भाषण देण्यासाठी सज्ज असताना, त्यांचा संयुक्त संदेश सामायिक मूल्ये आणि परस्पर लाभावर आधारित एका परिपक्व भागीदारीचे प्रतीक असेल. ही युती त्यांची एकत्रित आर्थिक ताकद, सुरक्षा सहकार्य, सांस्कृतिक संबंध आणि नावीन्यपूर्ण भावना यांचा फायदा घेते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अटळ धोरणात्मक दृष्टिकोनाच्या मार्गदर्शनाखाली, ही भागीदारी केवळ पुनरुज्जीवित झालेली नाही-तर एका नवीन युगासाठी तिची पुनर्कल्पना केली गेली आहे. एकत्र येऊन, भारत आणि युनायटेड किंगडम समृद्धी देण्यासाठी, सुरक्षा वाढवण्यासाठी आणि स्थिर आणि मुक्त जागतिक व्यवस्थेचे (Global जीवशी) आधारस्तंभ टिकवून ठेवण्यासाठी सज्ज आहेत. त्यांची नूतनीकृत युती केवळ त्यांच्या लोकांचे भविष्यच नव्हे, तर आगामी दशकांमध्ये आंतरराष्ट्रीय संबंधांचा मार्गही निश्चित करण्याचे वचन देते.

**ब्रिजेश सिंह (भा.पो.से.),**
**प्रधान सचिव तथा महासंचालक**
**(माहिती व जनसंपर्क).**

पान १ वरुन

## जिल्ह्यातील ९६५ ...

गेल्यामुळे त्या गावाची पैसेवारी जाहीर करण्यात आलेली नाही. तसेच मंठा तालुक्यातील चांदेश्वर व गोपेगाव हे गाव पुर्णतः निम्न दुधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये गेल्यामुळे तसेच गारटेकी, सोनुनकरवाडी व किर्तापूर तांडा या गावांना महसूल दर्जा प्राप्त नसल्यामुळे मंठा तालुक्यातील ५ गावांची पैसेवारी जाहीर करण्यात आली नाही. जालना जिल्ह्यातील पैसेवारी जाहीर केलेल्या एकुण ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आली आहे. खरीप पिकांची हंगामी पैसेवारी असलेल्या गावांची संख्या तालुकानिहाय पुढीलप्रमाणे आहे. जालना तालुका - १५१ गावे, बदनापूर-९२, भोकरदन-१५६, जाफ्राबाद-१०१, परतूर-९८, मंठा-११७, अंबड-१३८, घनसावंगी-११८ गावांचा समावेश आहे.

## खातेदारांना परतावा ...

‘ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता निधी (Depositor Education and wareness Fund - DEF)' मध्ये हस्तांतरित केल्या जातात. तथापि, खातेदारांना आपले पैसे परत मिळवण्याचा पूर्ण हक्क आहे. ठेवी परत मिळविण्यासाठी संबंधित खातेदारांनी आपल्या बँकेत संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे व अद्ययावत KYC सादर करणे आवश्यक आहे. या मोहिमेद्वारे सर्व बँकांकडून जनजागृती शिबिरे व ग्राहक भेटी आयोजित केल्या जाणार असून, खातेदारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी व्यवस्थापक मंगेश केदार यांनी केले आहे.

## जलतरण प्रशिक्षक ...


प्रतीक आहे. श्री. झोळगे यांनी आपल्या अथक मेहनतीने आणि विलक्षण एकाग्रतेने हे यश प्राप्त केले आहे.

कैलाश झोळगे यांनी गोल्डन जुबिली स्कूल, जालना येथे सलग १३ वर्षे स्विमिंग प्रशिक्षक म्हणून कार्य केले आहे. सध्या ते जालना सिव्हिल क्लब येथे स्पोर्ट्स क्लबचे प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत.त्यांच्या या ऐतिहासिक यशाबद्दल जालना शहरातील नागरिक, क्रीडाप्रेमी, विद्यार्थी व सहकारी वर्गाकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचा अपमान हे चिंताजनकच



सुप्रीम कोर्टात एका केसची सुनावणी सुरु असताना एका माथेफिरू वकिलाने सरन्याधिशांच्या रोखाने बूट भिरकावण्याचा प्रयत्न केला तो प्रकार निंदनीय असला तरी, तो शारीरिक हल्ला करणारा गंभीर गुन्हाच आहे.वकिलाने पश्चाताप व्यक्त न करणे हि बाब सुद्धा चिंता निर्माण करणारी आहे. लोकशाहीतील सर्वच स्तंभाविषयी नाराजी व संशयाचे वातावरण आहे सरकारी यंत्रणेने याचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. हि बाब पोलीस ह्यांनी आपल्या अधिकाराचा वापर करून त्या गुन्हेगारावर जीवघेणा हल्ला आणि तोही प्रत्यक्ष न्यायनिवाडा सुरु असताना भर कोर्टात जे कृत्य केले त्यात सरन्यायाधीश भूषण गवई ह्यांनी पोलिसांच्या कामात हस्तक्षेप करणे हे कायद्याला धरून नाही सदर घटना कोर्टात घडली असल्यामुळे तो अपमान फक्त सरन्यायाधीशाचाच नसून त्या पवित्र खुर्चीचा सुद्धा आहे.सदर प्रसंग पाहता एखाद्याला हृदय विकाराचा झटका आला असता तर ? सरन्यायाधीश गवई ह्यांनी गुन्हेगाराला सोडून देण्याचा आदेश देताना त्याच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई करू नये हे त्या गुन्हेगाराला कोर्टात हजर केल्यानंतर निर्णय देणे संयुक्त ठरले असते. सरन्यायाधीश भूषण गवई हे कष्टाळू सचोटीने आणि गुणवत्तेमुळे नियमाप्रमाणे त्यांना सरन्यायाधीश पदावर विराजमान झाले. न्यायाधीशाना जातपात धर्म लागू होत नाही. निष्पक्षपणे आपला निर्णय देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे न्यायची बूज राखायची व संविधानाचे पालन करायचे असेल, तर व भविष्यात असे प्रकार घडू नये असे वाटत असेल तर पोलिसांनी त्या गुन्हेगाराला कठोर शिक्षा बरोबर सरन्यायाधीश श्री भूषण गवई ह्यांना पोलसांच्या कामात हस्तक्षेप केल्याबद्दल कायदेशीर नोटीस पाठवून त्यांचे स्टेटमेंट घेणे हे कायद्याला धरून आहे त्या गुन्हेगाराने धर्माधांचे विष पेरण्याचे काम करताना स्वतःची जगभरात नावाची,कृत्याची चर्चा व्हावी म्हणून केलेला विकृत प्रकार वाटतो.त्याच्या नावाचा गवगवा होणार नाही ह्याची काळजी विशेषता प्रसारमाध्यमांनी घ्यावी, कारण, म्हातारी मेल्याचे दुःख नाही मात्र काळ सोकावता कामा नये



**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर**

### ‘मनाचे श्लोक’ नावाचा चित्रपट म्हणजे संत वाङ्मयाचा अपमान !

# चित्रपटाचे नाव न बदलल्यास हिंदू समाज चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही !

### हिंदु जनजागृती समितीचा इशारा

**मुंबई -** राष्ट्रसंत श्री समर्थ रामदास स्वामी महाराज यांनी रचलेल्या ‘मनाचे श्लोक’ या पवित्र धार्मिक ग्रंथाच्या नावाचा वापर करून त्याच नावाने मराठी चित्रपटाची निर्मिती करणे, हा हिंदूंच्या श्रद्धेचा बाजार मांडण्यासारखे आहे. हा समर्थ रामदासस्वामींचा अपमानच आहे. उच्चतम नैतिक मूल्ये शिकवणाऱ्या ग्रंथाचे नाव केवळ मनोरंजन, व्यावसायिक लाभ आणि सवंग प्रसिद्धीसाठी वापरणे, हा कोट्यवधी श्रीरामभक्तांच्या आणि समर्थभक्तांच्या धार्मिक भावना पायदळी तुडवण्याचा प्रकार आहे. संतपरंपरेचा हा अपमान हिंदू समाज कदापि सहन करणार नाही. जर या चित्रपटाचे नाव तात्काळ बदलले नाही, तर हिंदू समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करेल आणि चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही. शासन आणि सेन्सॉर बोर्डाने याची तातडीने गंभीर दखल घेऊन मनाचे श्लोक हे पवित्र नाव




चित्रपटाच्या शीर्षकातून हटवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी केली आहे. सुनील घनवट पुढे म्हणाले की, या संदर्भात समितीच्या वतीने शासन व सेन्सॉर बोर्डाला निवेदन देण्यात येणार असून, संबंधितांना कायदेशीर नोटीसही पाठवली जाईल. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली कोणी कुराण किंवा बायबल यांसारख्या धार्मिक ग्रंथांची नावे वापरून चित्रपट बनवण्याचे धाडस करेल का? आणि जरी केले, तरी सेन्सॉर बोर्ड त्याला परवानगी देईल का? मग केवळ हिंदूंच्याच धार्मिक भावना वारंवार का दुखावल्या जातात? यापूर्वी ‘द डा विंची कोड’ आणि ‘विश्वरूपम’ यांसारख्या चित्रपटांमुळे अनुक्रमे ख्रिस्ती व मुस्लिम धर्मीयांच्या भावना दुखावल्याने अनेक राज्यांत त्यांच्या प्रदर्शनावर बंदी घालण्यात आली होती. या चित्रपटाच्या बाबतीतही कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि सेन्सॉर बोर्ड जबाबदार असतील.

घनवट पुढे म्हणाले, ‘‘सर्वोच्च न्यायालयाने लाल बाबू प्रियदर्शी विरुद्ध अमृतपाल सिंग (२०१५) १६ डउउ ७९५ या खटल्यात स्पष्ट केले आहे की, 'रामायण'सारख्या पवित्र ग्रंथांच्या नावांचा वापर व्यावसायिक फायद्यासाठी मक्तेदारी म्हणून करता येत नाही. या तत्त्वानुसार ‘मनाचे श्लोक’ हे नाव चित्रपटासाठी वापरणे कायद्याच्या आणि नैतिकतेच्या विरोधात आहे. भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २९९ नुसार हेतुपुरस्सर धार्मिक भावना दुखावणे हा एक गंभीर, दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे; तसेच सिनेमॅटोग्राफ कायदा १९५२च्या कलम ५-ब नुसार सामाजिक सलोखा आणि नैतिकता धोक्यात आणणाऱ्या कोणत्याही चित्रपटाला प्रमाणपत्र न देण्याची जबाबदारी सेन्सॉर बोर्डाची आहे.’’

शेवटी श्री. घनवट यांनी म्हटले की, ‘मनाचे श्लोक’ हे शीर्षक चित्रपटातून त्वरित आणि बिनशर्त मागे घ्यावे. केंद्र आणि राज्य शासनाने भविष्यात अशा प्रकारे धार्मिक प्रतीकांचा गैरवापर रोखण्यासाठी कठोर कायदा करावा.

### संवेदनशील मंत्री भरतशेठ गोगावले यांची मानवतावादी तत्परता

## अपघातग्रस्त तरुणांना तात्काळ उपचारांसाठी आपल्या वाहनातून रुग्णालयात केले दाखल



**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** नेहमीच रात्री अपरात्री अपघातग्रस्तांच्या मदतीला धावून जाणाऱ्या संवेदनशील मनाचे लोकप्रिय मंत्री नामदार भरतशेठ गोगावले आपल्या निवासस्थाकडे जात असताना यांच्या वाहन चालकाच्या रात्री एक वाजता माणगाव कांदळगाव परीसरात रस्त्याच्या कडेला गर्द झाडीतून दोन अपघातग्रस्त तरुणांची आर्त हाक हेल्प, हेल्प! अशी हाक कानावर पडली. वाहन चालकाने मंत्री महोदयांना सांगितले, मंत्री महोदयांनी ड्रायव्हर ला तात्काळ गाडी थांबवायला सांगितली आणि संवेदनशील मनाचे मंत्री भरतशेठ गोगावले त्या अपघातग्रस्तां जवळ गेले. आणि त्या जखमी रक्तबंबाळ तरुणांना आपल्या वाहनातून माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यासाठी माणगावच्या दिशेने रवाना झाले.

राज्याचे कॅबिनेट मंत्री नामदार भरतशेठ गोगावले हे मुंबईवरून महाडकडे निजामपूर मार्गे आपल्या निवासस्थानाकडे परतत असताना, रात्री सुमारे १ वाजताच्या सुमारास मौजे कांदळगाव तालुका माणगाव हद्दीतून जात असताना हेल्प, हेल्प अशी हाक मंत्री महोदयांचे वाहन चालक यांना ऐकू आली. त्या आवाजाच्या दिशेने पाहिल्यावर झाडीत दोन अपघातग्रस्त दुचाकीस्वार अडकलेले दिसले. मंत्री भरतशेठ गोगावले यांनी तात्काळ आपल्या ताफ्याला थांबवून घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्या सहकाऱ्यांच्या आणि ताफ्यातील पोलिसांच्या मदतीने त्या दोन्ही तरुणांना झाडीतून बाहेर काढून स्वतःच्या वाहनातून उपचाराकरिता माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

दरम्यान, युवा जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी आधीच रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांना सतर्क केले होते. त्यामुळे मंत्री महोदय पोहोचताच रुग्णालयातील स्टाफने तात्काळ उपचार सुरू केले. या अपघातात एका तरुणाच्या डोक्याला १७ टाके पडले असून दुसऱ्या तरुणाचा हात व पाय फ्रॅक्चर झाला आहे. दोघांवर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातग्रस्तांना सुरक्षितपणे रुग्णालयात दाखल करून, त्यांच्या प्रकृतीची खात्री करून घेतल्या नंतरच मंत्री भरतशेठ गोगावले महाडकडे रवाना झाले.

### शेतकऱ्यांच्या प्रश्नी शिवसेनेचा आवाज दणाणला

## संपूर्ण कर्जमुक्त करून अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत द्या - भास्करराव अंबेकर

**जालना । प्रतिनिधी-** जालना जिल्ह्यात झालेल्या अभूतपूर्व अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकर्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करून अतिवृष्टीग्रस्ताना भरीव मदत देण्याची मागणी जालना जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, माजी आमदार संतोष सांबरे यांच्या नेतृत्वातील

शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली. यावेळी उपस्थित पदाधिकार्यांनी तीव्र निदर्शने करीत जिल्हाधिकारी कार्यालयात प्रचंड घोषणाबाजी करून कार्यालय दणाणून सोडले. या शिष्टमंडळात जिल्हासंघटक भानुदास घुगे,उपजिल्हाप्रमुख भगवानराव कदम,मुरलीधर शेजूळ,माजी सभापती मुरलीधर थेटे, तालुकाप्रमुख हरिहर शिंदे,जयप्रकाश चव्हाण, माजी जिप सदस्य बबनराव खरात, शहरप्रमुख बाला परदेशी, घनशाम खाकीवाले, दुर्गेश काठोटीवाले, प्रभाकर उगले, बाबुराव कायंदे आदींचा समावेश होता. यावेळी निवेदन करतांना जिल्हाप्रमुख अंबेकर म्हणाले की, मागील काही दिवसात जालना जिल्ह्यातील सर्वच मंडळात प्रचंड मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमुळे जालना जिल्ह्यातील शेतकर्यांचे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले. शेतकर्यांची सोयाबीन, कपाशी, तूर, फळबाग आदी पिके पूर्णतः हातची गेली. अगोदरच पेरणी-मशागतीसाठी शेतकर्यांनी सरकारी, खाजगी बँका व इतर मार्गाने कर्ज काढून केलेला खर्च पूर्णतः वाया गेला आहे. अशा अडचणीतील शेतकर्याला दिलासा देण्यासाठी सरकारने अत्यंत खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे होते परंतु विरोधी पक्षाच्या व संघटनांच्या दबावामुळे सरकारने मंगळवारी नुकतीच मदतीची घोषणा केली. सरकारने घोषित केलेली मदत ही अतिशय तुटपुंज्या स्वरुपाची आहे. मराठवाड्यात झालेल्या प्रचंड अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शेतकर्यांना भरीव मदत मिळणे गरजेचे असल्याचे सांगितले अद्यापही अनेक मंडळातील अतिवृष्टीचे पंचनामे झालेले नाहीत ही प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू असून सदरील पंचनामे लवकरात लवकर करण्यात यावे, पर्जन्यमापक यंत्र खराब असल्याने अतिवृष्टीची काही मंडळात नोंद झालेली नाही, तेथेही अतिवृष्टी गृहीत धरून मदत करण्यात यावी, अशा विविध मागण्या जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आल्या. यावेळी शिवसेनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## डाक अदालतीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** टपाल विभागाकडून सेवा देतेवेळी काही त्रुटीमुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार करण्याची वेळ येते. या तक्रारीचा योग्य न्याय निवाडा करण्यासाठी पोस्टा खात्याने वेळोवेळी डाक अदालत घेण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये डाक विभागाचे अधिकारी तक्रार सोडविणार आहेत. तरी डाक अदालत प्रवर अधिक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर येथे दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. विशेषत: टपाल वस्तु, मनी ऑर्डर, बचत बँक खाते, प्रमाणपत्र इत्यादीच्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार आहेत. तक्रारीचा उल्लेख सर्व तपशिलासह केलेला असणे आवश्यक आहे. आपल्या तक्रारी ११ ऑक्टोबर २०२५ पर्यंत दाखल कराव्यात, असे आवाहन प्रवर अधिक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.



राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान स्पर्धा

# अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अभियानात सक्रीय सहभाग घ्यावा - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान स्पर्धेत उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यालयांना व कर्मचाऱ्यांच्या कामाची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये घेतली जाणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, संस्था आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशासनात गतिमानता व लोकाभिमुखता आणण्यासाठी या अभियानात सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान स्पर्धेविषयी जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवार दि.८ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा या अभियानाचा कृती कालावधी प्रतिवर्षी दि.२० ऑगस्ट ते २ ऑक्टोबर असा असतो. योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेसाठी दि.१६ ऑक्टोबर २०२५ पासून ऑनलाईन अर्ज स्विकारण्यात येणार आहेत. या योजनेचे अर्ज स्विकारण्यासाठी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा पोर्टल विकसीत करण्यात आले असून या संकेतस्थळाची लिंक pragatiabhiyan.maharashtra.gov.in अशी आहे.स्पर्धेसाठी ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची मुदत दि.१६ ते ३१ ऑक्टोबर २०२५ अशी असून वेळापत्रक शासन निर्णयातील परिशिष्ट क मध्ये दर्शविण्यात आले आहे. प्रस्ताव तपासणीसाठी तालुका, जिल्हा, विभागीय आणि राज्य अशा चार स्तरावर निवड समित्या असतील. तालुकास्तरील प्रस्ताव जिल्हा समितीकडे, जिल्हास्तरावरील प्रस्ताव विभागीय समितीकडे आ णि विभागीय स्तरावरील प्रस्ताव राज्य समितीकडे पाठविले जातील. कार्यालयीन व्यवस्थापन, सेवांची गुणवत्ता, लोकाभिमुखता, ई-गव्हर्नस,संसाधनाचा प्रभावी वापर, तंटा व तक्रार मुक्त कार्यालय आणि नाविण्यपूर्ण संकल्पना, उपक्रम अशा सात प्रमुख कार्यक्षेत्रावर ही स्पर्धा आधारीत असणार आहे. तरी शासकीय संस्था, अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशासकीय सुधारणाबाबत आपले प्रस्ताव शासन निर्णयात नमुदप्रमाणे कार्यवाही करुन पाठवावेत, असे निर्देशही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत.

# झाडतोड करणाऱ्यांना दंड व कारावास

जालना महानगरपालिकेचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात झाडांची अंधाधुंद तोड अथवा वृक्षांना हानी पोहोचविणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याचा जालना शहर महानगरपालिकेचा इशारा देण्यात आला आहे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ च्या कलम ८(१) व २०(क) नुसार, कोणतीही व्यक्ती झाड तोडणे किंवा झाडांना कोणत्याही प्रकारची हानी पोहोचवणे हे कायद्यानुसार गुन्हा मानला जातो.

या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर रु. १ लाखांपर्यंत दंड तसेच ३ वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, शहरातील हरित संतुलन आणि पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने वृक्षतोडीपासून दूर राहावे. झाडे तोडताना किंवा फांद्या छाटताना संबंधित अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

शहरातील रस्त्यांलगत, शासकीय जागांवर व उद्यान परिसरात काही ठिकाणी झाडांची तोड चालू असल्याचे निदर्शनास येत असल्याने, महानगरपालिकेने यावर कठोर भूमिका घेतली आहे. झाडतोड करणाऱ्या किंवा आदेशाविना झाडांची हानी करणाऱ्यांविरुद्ध दंडात्मक आणि फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, वृक्ष हे शहराचे फुफ्फुस आहेत. त्यांचे जतन हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. कोणत्याही विकासकामांच्या नावाखाली झाडांची तोड केली जाणार नाही. आवश्यक असेल तर कायदेशीर परवानगी घेऊनच कार्यवाही करावी.

# जालना बाजार समितीला जिल्हाधिकारी यांनी भेट देवून पाहणी केली



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जालना येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार पेठेतील फळे व भाजी मार्केटला प्रत्यक्ष भेट देवून येथील सोयी-सुविधांची पाहणी केली. यावेळी बाजार परिसराच्या पाहणी दरम्यान फळे व भाजीपाला मार्केट परिसराची दररोज स्वच्छता करून इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणेबाबत संबंधिताना सूचना दिल्या. तसेच पुन्हा जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल या कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट देवून इतर विभागाची पाहणी करणार आहेत.

यावेळी पाहणी दरम्यान अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, कृषी उपसंचालक संजय कायंदे, बाजर समितीचे प्रशासक परमेश्वर वरखडे आणि सचिव भरत तनपुरे आदी उपस्थित होते.

# जालना बाजार समिती कर्मचाऱ्यांचा संघर्ष यशस्वी

उपोषण स्थळीच मागण्यांवर शिक्कामोर्तब

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेले कृषी उत्पन्न बाजार समितीतील कर्मचाऱ्यांचे आमरण उपोषण आज यशस्वीरीत्या संपुष्टात आले. उपोषणकर्त्यांच्या सर्व मागण्या प्रशासनाने मान्य केल्याने अखेर कर्मचाऱ्यांनी आपले उपोषण मागे घेतले.

मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या आदेशानुसार बदनापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आस्थापनेवर अतिरीक्त कर्मचारी असल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना जालना बाजार समितीच्या आस्थापनेवर बदली करून त्यांची मुळ सेवा व जेष्ठता कायम ठेवण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती.

या मागणीसाठी संजय छबीलवाड, ज्ञानदेव भिकाजी चंद (कनिष्ठ लिपिक), राहुल कृष्णाजी तायडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. उपोषणाचा आज तिसरा दिवस असताना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना कार्यालयातील अधिकारी यांनी उपोषण स्थळी भेट देऊन संबंधित सर्व मागण्या मान्य झाल्याचे कळविले.




अधिकाऱ्यांनी उपोषणकर्त्यांना पाणी पाजून उपोषण संपविण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या समाधानानंतर उपोषण स्थळी उपस्थित नागरिक आणि सहकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

या निर्णयामुळे बाजार समितीतील कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेचे स्वागत करण्यात येत आहे.

# कोर्ट आदेश धाब्यावर? अंशकालीन निदेशकांना न्याय नाकारून 'अतिथी नेमणुकींचा' गैरप्रकाराची तक्रार

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात न्यायालयाच्या आदेशाचा उघडपणे अवमान करत अंशकालीन कला निदेशकांना नाकारून अतिथी निदेशक नेमणुकींचा गैरप्रकार केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. अंशकालीन निदेशक दीपक ज्ञानेश्वर दवणे यांनी याबाबत सविस्तर तक्रार दाखल करून हा प्रकार म्हणजे कोर्ट आदेशाचा थेट अवमान असल्याचा ठपका जिल्हा परिषद प्रशासनावर ठेवला आहे.

**कोर्ट आदेश असूनही मनमानी नेमणुका**

दवणे हे २०१२ पासून अंशकालीन निदेशक म्हणून कार्यरत असून, २०१७ ते २०१९ आणि २०२४ ते २०२५ या कालावधीत त्यांनी प्रामाणिक सेवा बजावली. तरीदेखील ५ जून २०२५ च्या शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ लावत, गटशिक्षणाधिकारी (पं.स. मंठा) यांनी त्यांची नियुक्ती नाकारली आणि त्याऐवजी अतिथी निदेशकांना रुजू करून घेतले, अशी माहिती समोर आली आहे.

दवणे यांच्या म्हणण्यानुसार, कोर्टात ८७८६ अंशकालीन निदेशकांची याचिका प्रलंबित असताना जिल्हा शिक्षण विभागाने न्यायालयाच्या आदेशाकडे पाठ फिरवली आहे. अमरावती जिल्हा परिषदेने न्यायालयाचा आदेश पाळून अंशकालीन निदेशकांना प्राधान्य दिले आहे; मात्र जालना जिल्हा परिषदेने मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण विभागाच्या निष्क्रियतेमुळे आदेश धाब्यावर बसवला, असा आरोप त्यांनी केला.

**शासन निर्णय स्पष्ट, पण कारवाई शून्य**

संदर्भ क्रमांक ५ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १२ (उ) नुसार, ही योजना फक्त अंशकालीन निदेशकांसाठी लागू राहील, असे स्पष्ट नमूद आहे. तरीदेखील ५ जून २०२५ च्या शासन निर्णयात नमूदप्रमाणे १ सप्टेंबर २०१७ रोजी निर्माण केलेली अतिथी निदेशकांची पदे रद्द करण्यात आली असतानाही जिल्ह्यात काही शाळांमध्ये नव्या अतिथी नेमणुका करण्यात आल्या आहेत.

यामुळे पात्र आणि अनुभवी अंशकालीन निदेशकांना अन्याय सहन करावा लागत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोर्ट आदेशानुसार अंशकालीन निदेशकांची नियुक्ती करणे हे पहिले कर्तव्य असताना, त्याऐवजी नव्या नेमणुका देणे ही प्रशासकीय मनमानी आहे, असा आरोप दवणे यांनी केला.

दवणे यांनी पुढे स्पष्ट केले की, कोर्ट आदेशाचा अवमान करणे हा गुन्हा आहे. जर जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने पावले उचलली नाहीत, तर आम्ही Contempt of Court अंतर्गत कायदेशीर कारवाईसाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावू.

या संपूर्ण प्रकरणामुळे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. जिल्हा परिषद प्रशासन झोपलेले आहे की काही विशिष्टांना कृपा दाखवण्यासाठी कायद्याकडे पाठ फिरवत आहे? असा ज्वलंत सवाल दवणे यांनी उपस्थित केला आहे.

जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये कला शिक्षक (ए.टी.डी.) पदे रिक्त असतानाही पात्र अंशकालीन निदेशकांना डावलून नव्या नेमणुका केल्याने न्यायालयाचा अवमान आणि शैक्षणिक क्षेत्रातील अन्यायाचा वादळ उठण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

# दिक्षा साळवे एम.ए.संगीत विषयात विद्यापीठात तृतीय

**परभणी । प्रतिनिधी -** कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी येथील एम. ए. संगीत विषयाची अंतिम वर्षाची विद्यार्थिनी कु. दिक्षा पद्माकरराव साळवे हिने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड उन्हाळी २०२५ या परीक्षेत एम.ए.संगीत विषयात विद्यापीठातून तृतीय येण्याचा बहुमान पटकाविला.



तिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. हेमंतराव जामकर, उपाध्यक्ष मा.ड. किरणराव सुभेदार, कोषाध्यक्ष डॉ. अभयराव सुभेदार, सचिव मा. विजयराव जामकर, सहसचिव डॉ. संजयराव टाकळकर, संस्थेचे सर्व संचालक, प्रभारी प्राचार्य डॉ. संगीता आवचार आणि सर्व प्राध्यापकांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी दिक्षा साळवे यांना शुभेच्छा दिल्या.

दिक्षा साळवे यांच्या या यशा साठी संगीत विभाग प्रमुख डॉ. रवींद्र इंगळे, डॉ.पल्लवी कुलकर्णी यांचे मार्गदशन लाभले.

# शिवसेना आध्यात्मिक आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी खैरे, देठे यांची निवड



**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना प्रणित धर्मवीर आध्यात्मिक आघाडीच्या जालना जिल्हाध्यक्षपदी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह .भ.प.काका महाराज खैरे आणि ह .भ .प.गजानन महाराज देठे यांची निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल शिवसेना उपनेते, अंदाज समितीचे अध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांनी त्यांच्या निवासस्थानी सत्कार केला. यावेळी माऊली वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ह. भ. प. बळीराम महाराज गवारे, शिवसेना तालुकाप्रमुख भगवान अंभोरे ,युवा सेना तालुकाप्रमुख राहुल गवारे ,माजी जिल्हा परिषद सदस्य कैलास चव्हाण ,पानशेंद्राचे सरपंच बाळासाहेब पाचरणे ,गणेश शिंदे आदींची उपस्थिती होती.

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी शिवसेनेचं धरणे आंदोलन

# संपूर्ण कर्जमाफी आणि हेक्टरी रु ५०,००० भरपाईची जोरदार मागणी

**धाकलगाव । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अंबड शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आज दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी अंबड तहसील कार्यालयावर भव्य धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफी, सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीत बाधित पिकांना हेक्टरी रु ५०,००० नुकसानभरपाई, पिकविम्याचे चार ट्रिगर निकष पुन्हा लागू करणे, तसेच घर आणि पशुधनासाठी वाढीव मदतीचे निकष लागू करणे यांसह अनेक मागण्या करण्यात आल्या.

शिवसैनिकांनी आंदोलनादरम्यान कर्जमाफी झालीच पाहिजे! शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपये मिळालेच पाहिजेत! अशा घोषणांनी तहसील परिसर दणाणून सोडला.

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी रु ५०,००० अनुदान द्यावे. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी तातडीने जाहीर करावी. पिकविमा निकष पुर्वीप्रमाणे चार ट्रिगरवर ठेवावेत. घर व पशुधन नुकसानीसाठी जुने निकष लागू न करता वाढीव मदत देण्यात यावी. आंदोलनाचे नेतृत्व उपजिल्हाप्रमुख हनुमानजी धांडे, मा. तालुका प्रमुख अशोक पाटील बरडे, शिवसेना तालुका प्रमुख दिनेश काकडे, मा. शहर प्रमुख कुमार भाऊ रुपवते, उपतालुकाप्रमुख विजय सोमाणी, तसेच कल्याण टकले, सिद्धेश्वर उबाळे, रजनीश कनके, प्रभु बामणे, अशोकराव खापे, बाबासाहेब निकम, अशोकराव गिरी, उल्हास वाघ, रमेश वराडे, भाऊसाहेब तांबे, अंनिस तांबोळी, गजानन सानप, मुकुंद हुशे, शैलेश दिवटे, शाम राठोड, अंबादास मुळे, रवि इंगळे, संदीप सदावर्ते, सुरेश राणा, महादेव लेकुरवाळे, सुनिल वाकणकर, गोरख डोखे, शिवराम भोजने, बाळासाहेब नारळे, विठ्ठल शिंदे, सिताराम विर, नाथा मिठे, कैलास खरात यांसह असंख्य शिवसैनिक, पदाधिकारी आणि शेतकरी उपस्थित होते.

या आंदोलनानंतर शिवसेना प्रतिनिधीमंडळाने तहसीलदारांना निवेदन सादर करून शासनाकडून तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली.

शिवसेना पक्षाने स्पष्ट इशारा दिला की, शेतकऱ्यांच्या मागण्या न मानल्यास पुढील काळात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल. शासनाने केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष मदत देणे आवश्यक आहे.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.